| ९ | **शाळांचे जादा फी वाढ प्रस्ताव मान्यता.** |
|---|---|

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे या कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या पुणे/सोलापूर/अहमदनगर या जिल्ह्यातील सर्व अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना शैक्षणिक व इतर शुल्कात वाढ करावयाची झाल्यास शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-४ मार्च, २०१० च्या निर्णयानुसार सर्व संबंधित शाळांनी शासन निर्णय क्रमांक-एसएसएन ११९७/(३११/९७)/माशि-३, दिनांक-२२ जुलै, १९९९ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे व या आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्थेविरुध्द या कार्यालयाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येते.

ज्या अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांनी यापूर्वी शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दती व्यतिरिक्त सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय जादा शुल्क आकारणी केली असल्यास सदरचे जादा शुल्क संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ परत करणे आवश्यक आहे. असे न केल्यास फी कॅपिटेशन ॲक्ट, १९८७, माध्यमिक शाळा संहितेमधील तरतूदी व शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधित शाळांविरुध्द कारवाई करण्यात येते.

याबाबत सर्व अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांनी आपले शैक्षणिक व इतर शुल्काची आकारणी यामध्ये वाढ करावयाची झाल्यास आपले फी वाढीचे प्रस्ताव विहित नमुन्यात आपल्या कार्यक्षेत्रातील सक्षम अधिकाऱ्यास (शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ) यांचेकडे सादर करावेत.

**अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांना शैक्षणिक व इतर शुल्कात वाढ करावयाची झाल्यास संदर्भीय महत्वाचे शासन निर्णय व नियम खालीलप्रमाणे आहेत.**

**WWW.maharashtra.gov.in**

| | |
|---|---|
| १. | माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ४९.३, ५०.३ व ५०.६. |
| २. | सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.<br>महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७. |
| ३. | शासन पत्र क्रमांक एसएसएन ११९०/१२१७९०६/(२८४७), दिनांक-३१ ऑक्टोबर, १९९१. |
| ४. | शासन निर्णय क्रमांक-एसएसएन ११९७/(३११/९७)/माशि-३, दिनांक-२२ जुलै, १९९९. |
| ५. | शासन निर्णय क्रमांक-वेतअ १९९९/(७८६/९९)/माशि-१, दिनांक-३० नोव्हेंबर, १९९९. |
| ६. | शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-८ मे, २००९. |
| ७. | शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-२३ फेब्रुवारी, २०१०. |
| ८. | शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण २००९/(१०८/०९)/माशि ३, दिनांक-४ मार्च, २०१०. |

**सर्व अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांनी आपले शैक्षणिक व इतर शुल्काची आकारणी यामध्ये वाढ करावयाची झाल्यास शासन निर्णय क्रमांक-एसएसएन ११९७/(३११/९७)/माशि-३, दिनांक-२२ जुलै, १९९९ मधील तरतूदींचे अवलोकन करुन आपले फी वाढीचे प्रस्ताव विहित नमुन्यात आपल्या कार्यक्षेत्रातील सक्षम अधिकाऱ्यास (शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका / नगरपालिका शिक्षण मंडळ) यांचेकडे तीन प्रतीत फाईलवर क्रमांक नोंदवून सादर करावेत.**

**WWW.maharashtra.gov.in**

## प्रस्तावासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची अनुसूचि

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| १ | २ |
| १. | कव्हरिंग लेटर. |
| २. | शाळा नोंदणी / मान्यता प्रत. |
| ३. | वेळोवेळी नव्याने मान्यता दिलेल्या वर्ग / तुकड्या यांच्या मान्यतेच्या प्रती. |
| ४. | पटपडताळणीनुसार संच मान्यतेच्या संबंधित शैक्षणिक वर्षाच्या प्रती. |
| ५. | विद्यार्थी पटसंख्या व उपस्थिती, शाळा वर्ग व तुकडी संख्या. |
| ६. | कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संच मान्यतेनुसार मान्यता आदेशांच्या प्रती सेवाजेष्ठता यादीसह. |
| ७. | फी वाढीच्या प्रस्तावास अधिकृत पालक-शिक्षक संघाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली असल्यास सभेच्या इतिवृत्ताची व ठरावाची प्रत. |
| ८. | फी वाढीच्या प्रस्तावास अधिकृत पालक-शिक्षक संघाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता नाकारली असल्यास अशा प्रकरणी फी निश्चिती / वाढीव फी बाबत जे मुद्दे आक्षेपार्ह आहेत त्या मुद्दयांची प्रत, सभेच्या इतिवृत्ताच्या व ठरावाच्या प्रतीसह. |
| ९. | ज्या वर्षाची फी वाढ करावयाची आहे, त्या वर्षाचा वेतन व वेतनेतर खर्चावरील अंदाजित मान्य खर्चाचा अहवाल व मागील एक वर्षाचे सी.ए. यांचे स्टेटमेंट व अहवाल. (पावत्यांच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रतीसह.). |
| १०. | वेतनाबाबतचा अहवाल. |
| ११. | वेतनेतर खर्चावरील बाबींचा सविस्तर अहवाल. |
| १२. | याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्याकडून वसूल केल्या जाणाऱ्या विविध फी चा तपशिल. |

## प्रस्तावासोबत जोडावयाच्या कागदपत्रांबाबत सविस्तर माहिती अनुसूचिनुसार

१. शाळेचा फी निश्चिती / फी वाढ प्रस्ताव शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांचेकडे मंजूरीस्तव सादर करण्यासाठीचे विनंती वजा कव्हरिंग लेटर.

२. अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये यांची सक्षम अधिकाऱ्यांकडून (शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ) शाळा सुरु करण्यास मिळालेल्या शाळा नोंदणी / मान्यतेच्या आदेशांची सांक्षाकित झेरॉक्स प्रती.

३. शाळा मान्यतेनंतर वेळोवेळी नैसर्गिक / अतिरिक्त मान्यता दिलेल्या वर्ग / तुकड्या यांच्या मान्यतेच्या आदेशांच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रती.

४. ज्या शैक्षणिक वर्षाची फी निश्चित करावयाची आहे त्या वर्षाची संबंधित शाळेतील विद्यार्थी पट / उपस्थिती, शाळेतील वर्ग / तुकडी संख्या यावरुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ) यांनी पटपडताळणीनुसार मंजूर केलेल्या संच मान्यतेच्या प्रतीची चालू वर्षाची व मागील एक वर्षाची सांक्षाकित झेरॉक्स प्रती.

५. ज्या शैक्षणिक वर्षाची फी निश्चित करावयाची आहे त्या वर्षाची संबंधित शाळेतील विद्यार्थी पट / उपस्थिती, शाळेतील एकूण वर्ग / तुकडी संख्या सकाळ व दुपार सत्रासह माहिती दर्शविणारा सांख्यिकी तक्ता मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने मूळ प्रतीत.

६. संबंधित शाळेस संच मान्यतेप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ) यांनी जी शिक्षक / शिक्षकेतर पदे मान्य केलेली आहेत त्या संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडून वैयक्तिक मान्यता प्राप्त करुन घेतलेबाबत मान्यतेच्या आदेशांच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रती.

७. फी वाढीच्या प्रस्तावास अधिकृत पालक-शिक्षक संघाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली असल्यास सभेच्या इतिवृत्ताची व ठरावाची प्रत सांक्षाकित झेरॉक्स प्रत सोबत जोडण्यात यावी.

८. फी वाढीच्या प्रस्तावास अधिकृत पालक-शिक्षक संघाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता नाकारली असल्यास अशा प्रकरणी फी निश्चिती / वाढीव फी बाबत जे मुद्दे आक्षेपार्ह आहेत त्या मुद्दयांची प्रत, सभेच्या इतिवृत्ताच्या व ठरावाच्या प्रतीसह सांक्षाकित झेरॉक्स प्रत सोबत जोडण्यात यावी.

९. ज्या वर्षाची फी वाढ करावयाची आहे, त्या वर्षाचा व मागील एक वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल. (पावत्यांच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रतीसह.). जर चालू शैक्षणिक वर्षातील फी वाढ करावयाची असल्यास त्या वर्षाची वेतन व वेतनेतर वरील अंदाजित मान्य खर्चाचा अहवाल सादर करावा.

**१०** वेतनावरील खर्चाचा अहवाल.

**१.** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनावर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील सी.ए. यांनी प्रमाणित केलेला असावा. (सोबत सी.ए. यांचा अहवाल व सर्व स्टेटमेंट जोडण्यात यावे.).

**२.** संच मान्यतेप्रमाणे जे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी शाळांना मान्य आहेत व ज्यांना सक्षम अधिकाऱ्याची वैयक्तिक मान्यता आहे अशाच शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा करण्यात आलेल्या वेतनाचा खर्च फी निश्चिती / फी वाढ करताना विचारात घेण्यात यावा.

**३.** या व्यतिरिक्त इतर अतिरिक्त जादा विषयांसाठी शिक्षकांची नियुक्ती शाळांना करता येईल. (शासन निर्णय क्रमांक- एसएसएन ११९७/(३११/९७)/माशि-३, दिनांक-२२ जुलै, १९९९).

**क)** विद्यार्थ्यांच्या मानसिक विकास तसेच सुप्त गुणांच्या विकासाकरिता अर्थात सर्वांगीण उन्नतीकरिता काही शाळा नृत्य, वाद्यवादन, ज्युडो-कराटे, संगणक शिक्षण देण्याकरिता तज्ञ व्यावसायिक व्यक्तींना नियुक्त करुन विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाव्यतिरिक्त शिक्षण देतात.

**ख)** मात्र याप्रमाणे जादा नेमलेल्या शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अतिरिक्त पदांना पालक शिक्षक संघांच्या सर्वसाधारण सभेची मान्यता असावी.

**४.** शाळेतील संबंधित शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महिनानिहाय वेतन अदा केल्याबाबत त्या शैक्षणिक वर्षातील स्वाक्षरी घेतलेल्या शीटच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रती. जर वेतन बँकामार्फत अदा केले जात असेल तर त्याबाबत संबंधितांचे वेतन बँकेकडे जमा केलेबाबत महिनानिहाय शीटच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रती.

**११.** वेतनेतर खर्चावरील बाबींचा सविस्तर अहवाल.

**१.** इमारत भाडे- इमारत भाड्यावरील प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मान्य केलेला खर्च विचारात घेण्यात यावा. अशासकीय विना अनुदानित संस्थांच्या पूर्व प्राथमिक, मान्यताप्राप्त प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये जर एकाच इमारतीत सकाळ व दुपार सत्रात भरत असतील तर त्याप्रमाणे माहिती सादर करावी.

२. यासाठी माध्यमिक शाळा संहिता मधील अनुसूची ''अ'' मध्ये दिलेल्या २ मधील ब, क, ड तसेच ३ ते २३ वर नमूद केलेल्या सर्व बाबींवरील केलेला खर्च विचारात घ्यावा. याशिवाय संगणक कक्ष, दृकश्राव्य कक्ष व इतर अत्याधुनिक आवश्यक शैक्षणिक साधनांचा लाभ विद्यार्थ्यांना देण्याकरिता लागणारा व्यवस्थापन खर्च विचारात घ्यावा.

**३.** माध्यमिक शाळा संहिता विभाग सहा- फी आणि फी माफी- शिक्षण फी नियम ४९.१ ते नियम ५०.६ अन्वये दिलेल्या खर्चाच्या बाबीवरील खर्च विचारात घ्यावा.

**१२.** याव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्याकडून वसूल केल्या जाणाऱ्या विविध फी चा तपशिल हा सी.ए. यांच्या अहवाल व सर्व स्टेटमेंटसह जोडून सोबत पावत्यांच्या सांक्षाकित झेरॉक्स प्रती जोडण्यात याव्यात.